**पुणे शहर व पिंपरी चिंचवड शहर येथील सीसीटीव्ही प्रकल्पाकरिता सल्लागार म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या मे. पीडब्ल्यूसी कंपनीस मार्च-२०१९ या कालावधीकरीता केलेल्या कामाचे देयक अदा करणेबाबत...**

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग
**शासन निर्णय क्रमांकः सीसीटी -३६१६/प्र.क्र.७६/भाग-४ /पोल-३**

मंत्रालय,दुसरा मजला,मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २७ जून २०१९.

**<u>वाचा:</u>**

१) शासन निर्णय, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, क्रमांक : GAD-मातंस-०८०/ ४/ २०१४-Directorate of I.T.-DIT (MH), दिनांक ०१.०७.२०१४, १९.०७.२०१७, ०९.१०.२०१७, २०.०३.२०१८.
२) शासन निर्णय, गृह विभाग, क्र. सीसीटी-३६१५/ प्र.क्र.९३/ पोल-३, दिनांक २९.०५.२०१५
३) शासन निर्णय, गृह विभाग, क्र. सीसीटी-३६१५/ प्र.क्र.७६/ भाग-१/ पोल-३, दिनांक २५.०७.२०१६, ०५.०६.२०१७, २५.०७.२०१७ व १३.१२.२०१८.
४) पोलीस आयुक्त, पुणे शहर, यांचे पत्र क्र. प्रलि-३/ सीसीटीव्ही-कॅमेरा-सध्याची-स्थिती, दिनांक ०३.०४.२०१९.
५) मे. प्राईस वॉटर हाऊस कूपर्स खा. मर्या. यांचे पत्र क्र.--, दिनांक ०४.०४.२०१९.

**<u>प्रस्तावना.</u>**

पुणे शहर व पिंपरी चिंचवड शहर येथील सीसीटीव्ही प्रकल्पाकरिता तांत्रिक सल्लागार म्हणून संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयाव्दारे मे. प्राईस वॉटर हाऊस कूपर्स खा. मर्या. या कंपनीची नियुक्ती करण्यात आली आहे. उक्त कंपनीच्या एक पूर्णवेळ वरिष्ठ सल्लागारास व एका अतिरिक्त सल्लागारास संदर्भ क्र.३ येथील दिनांक १३.१२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार दिनांक ३० जून, २०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. उक्त सल्लागारांना माहिती तंत्रज्ञान विभागाच्या संदर्भ क्र.१ येथील दिनांक २०.०३.२०१८ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे मानधन अदा करण्यात येते.

२. उक्त कंपनीच्या एक पूर्णवेळ वरिष्ठ सल्लागारास व एका अतिरिक्त सल्लागारास फेब्रुवारी २०१९ पर्यंत केलेल्या कामाचे देयक अदा करण्यात आले आहे. त्यांनी मार्च २०१९ मध्ये केलेले काम समाधानकारक आहे व उक्त प्रकल्प हा सुरळीत चालू असल्याचा अहवाल पोलीस आयुक्त, पुणे शहर, यांनी संदर्भ क्र.४ येथील पत्राव्दारे सादर केला आहे. त्या अनुसार उक्त कंपनीच्या एक पूर्णवेळ वरिष्ठ सल्लागारास व एका अतिरिक्त सल्लागारास मार्च २०१९ मध्ये केलेल्या कामाचे देयक अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याप्रमाणे शासनाने पुढील निर्णय घेतला आहे.

**<u>शासन निर्णय.</u>**

पुणे शहर व पिंपरी चिंचवड शहर सीसीटीव्ही प्रकल्पाकरिता सल्लागार म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या मे. प्राईस वॉटर हाऊस कूपर्स खा. मर्या. या कंपनीचे एक वरिष्ठ सल्लागार व एक अतिरिक्त सल्लागार यांना मार्च २०१९ केलेल्या कामाचे मानधन म्हणून एकूण रु.५,६६,८०९/- (रुपये पाच लक्ष, सहासष्ट हजार, आठशे नऊ फक्त) उक्त कंपनीला अदा करण्यास, याव्दारे, मंजुरी देण्यात येत आहे. सदर देयकाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

| Pune CCTV Project March 2019 | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| # | Period | Month | Resource Name | Designation | Man Month Rate (INR) | Deployment (Percentage) | Applicable Amount per Resource (INR) | Total Applicable Amount (INR) | OPE Claimed (INR) | Sub Total (INR) | GST @ 18% | Total Amount (INR) |
| A | B | C | D | E | F | G | H = FXG | I | J | K = I+J | L = 18% OF K | M = K+L |
| | Mar-19 | Mar-19 | Shri. Nikhil Motlag | Senior Consultant | 2,52,000 | 100% | 2,52,000 | 2,52,000 | 3,347 | 4,80,347 | 86,462 | 5,66,809 |
| | | | Shri. Amit Bhosale | Consultant | 2,25,000 | 100% | 2,25,000 | 2,25,000 | | | | |
| **Total** | | | | | | | | **4,77,000** | **3,347** | **4,80,347** | **86,462** | **5,66,809** |

टीप-

अ) उपरोक्त रकमा ह्या दरमहिना दरमाणूस (Man-Month) तत्वानुसार अदा करण्यात येत आहे.

ब) शासन निर्णय संदर्भ क्र.३ नुसार सल्लागारांना प्रकल्पावर होणा-या खर्चाच्या ५% च्या प्रमाणात प्रवास, भोजन व निवास इ. खर्च अनुज्ञेय करण्यात आला आहे.

क) संदर्भ क्र.७ अन्वये मे. पीड्ब्ल्यूसी कंपनीने सादर केलेल्या “Invoice” अनुसार सदर रकमा देण्यात येत आहे. उक्त रकमेमध्ये मार्च, २०१९ महिन्यासाठी १८% वस्तू आणि सेवा कर समाविष्ट करण्यात आला आहे.

ड) सीसीटीव्ही प्रकल्पासाठी संबंधित कंपनीला सल्लागाराच्या मानधनापोटी जादा रक्कम अदा केली आहे असे निदर्शनास आल्यास सदर जादा रक्कम संबंधित कंपनीकडून समायोजित करण्याचा अधिकार शासनास राहील.

इ) उक्त देयके ही अंमलात असलेले कर वजाती करून अदा करण्यात यावी.

२. उक्त खर्च हा "२०५५ - पोलीस, (००) १०९, जिल्हा पोलीस, (००) (०१) जिल्हा पोलीस बल, १३, कार्यालयीन खर्च (२०५५ ०१६८)" या तपशीलवार लेखाशीर्षाखाली सन २०१९-२० या वित्तीय वर्षातील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. उक्त निधी कोषागारातून आहरित करण्यासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांना “नियंत्रक अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे व त्यांच्या अधिनस्त आहरण व संवितरण अधिकाऱ्याला “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७०८१२५००८६५२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL GOPAL BORSE

Digitally signed by SWAPNIL GOPAL BORSE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=c6a6e7cad855fc787a96e36f11fbc87a9f66cfd9bad01184493f2735ad885627, postalCode=400032, street=2ND FLOOR,MANTRALAYA,MADAME CAMA MARG,MUMBAI, serialNumber=8538cd1e408948f7d025537d5f6589bd8958d1b95322e66d2cc5edf89ad0d79e, ou=HOME DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SWAPNIL GOPAL BORSE
Date: 2019.07.08 12:56:03 +05'30'

**(स्वप्नील गोपाल बोरसे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्य मंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) पोलीस आयुक्त, पुणे शहर.
५) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र शासन, मुंबई.
६) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
७) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
९) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१०) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
११) मे.पीडब्ल्यूसी खा. मर्या. २५२, वीर सावरकर मार्ग, शिवाजी पार्क, दादर, मुंबई-४०००२८.
१२) कार्यासन अधिकारी (व्यय-७/विनियम), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) कार्यासन अधिकारी (अर्थसं-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) निवड फाईल/ पोल-३.